| | **<u>प्रेसनोट</u>**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**<br>**पुणे-४११००६** | |
|---|---|---|

**जा.क्र./पोउआ/वाह/ ५७६२ /२०२३** **पुणे दिनांक - १०/०८/२०२३**

चतु:श्रृंगी वाहतुक विभाग अंतर्गत मेट्रोचे काम सुरु असून सदर कामाअंतर्गत बाणेर रोडवरील ग्रीन पार्क हॉटेल जंक्शन ते पल्लोड फार्म रोड दरम्यान पोर्टल बिम लॉचींगचे काम करण्यात येणार आहे. सदरचे काम करतेवेळी बाणेर रोडवरील वाहतूक सुरळीत राहणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/ सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (ए) (बी), ११६ (४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पुणे शहर, बाणेर रोडवरील पुणे विद्यापीठ ते बाणेर रोडकडे जाणाऱ्या वाहतूकीमध्ये दि. १२/०८/२०२३ रोजी ००.०१ ते दि. १५/०८/२०२३ रोजी २४.०० वा. पर्यंत खालीलप्रमाणे बदल करीत आहे.

**चतु:श्रृंगी वाहतूक विभागाअंतर्गत**

❖ बाणेर रोडवरील हॉटेल ग्रीनपार्क जंक्शन ते महाबळेश्वर हॉटेलकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग**

✓ पुणे विद्यापीठ चौकाकडून अभिमान श्री. जंक्शन येथून बाणेर कडे जाणाऱ्या वाहनचालकांना बाणेर फाटा चौकामध्ये उजवीकडे वळण घेवून आय.टी.आय. रोडवरील परिहार चौक्, डावीकडे वळण घेवुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे, नागरस रोडवरुन महाबळेश्वर हॉटेलजवळ बाणेर रोडवर येवून इच्छितस्थळी जाता येईल.

✓ ग्रीन पार्क हॉटेल चौकामधून डावीकडे वळण घेवून सोमेश्वर मंदिर मार्गे रामनदीवरील पुलानंतर उजवीकडे वळण घेवून पासपोर्ट कार्यालयासमोरुन बाणेर रोडवर येवून इच्छितस्थळी जाता येईल.

**( विजयकुमार मगर )**
पोलीस उप-आयुक्त,वाहतूक
पुणे शहर.

**प्रत :- सर्व संबंधितांना**